**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठाच्या उद्यान विभागाचा वृक्ष संवर्धनासह पशु, पक्षी संवर्धनाचा स्तुत्य उपक्रम

### पशु, पक्षी, मुक्या प्राण्यांना अभय - गाडगे बाबांच्या दशसूत्रीतील एक सूत्र

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा निसर्गरम्य परिसर ४५० एकरचा असून हा परिसर वनसंपदेने आच्छादला आहे. परिसरामध्ये अनेक प्रकारचे वृक्ष, वनऔषधी, झाडे, फळे, बांबू आदींचे संवर्धन मोठ्या प्रमाणात करण्यात आले आहे. विद्यापीठाचा उद्यान विभाग वृक्षसंवर्धनासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे नियोजनपूर्वक मार्गदर्शन त्यासाठी मोलाचे ठरत आहे. परिसरामध्ये अनेक पशु, पक्षी आहेत. संत गाडगे बाबांनी आपल्या दशसूत्रीत पशु, पक्षी, मुक्या प्राण्यांना अभय द्या, हे सूत्र सांगितले. निसर्गचक्र संतुलित राहण्यासाठी गाडगे बाबांचे विचार महत्वाचे आहेत. निसर्गचक्र संतुलनासाठी उद्यान विभागाने घेतलेला पुढाकार हासुद्धा महत्वाचा आहे. परिसरामध्ये ठिकठिकाणी मातीच्या भांड्यांमध्ये पशु, पक्षी आदींची तहान भागावी म्हणून पाणी ठेवण्यात आले आहे. परिसरामध्ये अनेक ठिकाणी अशाप्रकारे पाण्याने भरलेली मातीची भांडी ठेवल्यामुळे उन्हाच्या तडाख्यात झाडांवर राहत असलेले पशु, पक्षी यांचेसाठी पाण्याची सोय झाली आहे, त्यांची तहान भागत आहे.

विद्यापीठ परिसरात अनेक प्रकारचे पशु, पक्षी तसेच मोर सुद्धा आहे. वनसंवर्धना सोबतच पशु, पक्षी संवर्धनाचे कार्य उद्यान विभागाद्वारे होत आहे. याबद्दल उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम, कृषि सहाय्यक श्री भिमरावजी वाठोरे, श्री अरविंद आवारी आणि त्यांचे अधिनस्त कर्मचारी सातत्यपूर्ण परिश्रम घेत आहेत.

१४ एप्रिलला महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून इर्विन चौक येथे उद्यान विभागाच्यावतीने ५०० मातीच्या भांड्यांचे वितरण बाबासाहेबांना वंदन करण्यासाठी आलेल्या लोकांना विद्यापीठाच्यावतीने वितरण करण्यात आले. त्या प्रत्येकांनी आपल्या घरी पाण्याने भरलेले मातीचे भांडे पशु, पक्ष्यांसाठी ठेवल्यामुळे अनेक पशु, पक्ष्यांची तहान भागत आहे. विद्यापीठाने निसर्गचक्राचे संरक्षण करण्याकरीता उचललेल्या महत्वपूर्ण उपक्रमाचे सार्वत्रिक अभिनंदन होत आहे.

निसर्गरम्य परिसरासाठी विद्यापीठाला यापूर्वी राष्ट्रीय, राज्य स्तरावरील मानाचे पाच पुरस्कार देवून राज्य शासन व केंद्र शासनाने सन्मान केला आहे. वृक्षसंवर्धनाची ही चळवळ व्यापक व्हावी, जनजागृती होवून यामध्ये जास्तीतजास्त लोकांचा सहभाग वाढावा, वृक्षसंवर्धन क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा आणि संस्थांचा गौरव व्हावा, त्यांच्यापासून प्रेरणा घेवून इतरांनी कार्य करावे आणि निसर्गाचे संरक्षण व्हावे, हा महत्तम उद्देश डोळ्यासमोर ठेवून विद्यापीठाच्यावतीने दरवर्षी व्यक्ती व संस्थेला पर्यावरण पुरस्कार देवून गौरविल्या जाते. आजवर अनेक व्यक्तींना व संस्थांना हा पुरस्कार प्रदान झालेला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सुरुवातीला २ कोटी, नंतर ४ कोटी आणि १३ कोटी वृक्षलागवड योजनेंतर्गत शासनाने दिलेल्या उद्दिष्ट्यांनुसार विद्यापीठ परिसरात वृक्षारोपण करण्यात आलेले आहे. विशेष म्हणजे ती सर्वच्या सर्व जीवंत ठेवण्याकरीता उद्यान विभागाचे परिश्रम सार्थकी लागले आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. १३/०५/२०१९.

दै............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी